**ठळक बातम्या**

- कसारा-मनमाड दरम्यान रेल्वेची तिसरी आणि चौथी मार्गिका, पालघर - घोटी दरम्यान महामार्गाच्या चौपदरीकरणाला केंद्रीय मंत्रीमंडळाची मंजुरी

- आसाममध्ये आपात्कालीन परिस्थितीत विमान उतरवण्याच्या धावपट्टीचं प्रधानमंत्र्यांच्या उपस्थितीत लोकार्पण

- इराणमध्ये सत्ताबदल झालेला चांगला असेल असा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा दावा

**आणि**

- बांग्लादेश नॅशनलिस्ट पार्टीचे अध्यक्ष तारिक रहमान यांचं प्रधानमंत्र्यांकडून अभिनंदन

**<><><><><>**

केंद्र सरकारनं कसारा ते मनमाड दरम्यान रेल्वेची तिसरी आणि चौथी मार्गिका तसंच घोटी ते पालघर दरम्यान राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाचा निर्णय घेतला आहे. माहिती प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल झालेल्या केंद्रीय मंत्रीमंडळ बैठकीतल्या निर्णयांची माहिती आज नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत दिली. कसारा- मनमाड दरम्यानच्या रेल्वेच्या तिसऱ्या आणि चौथ्या मार्गिकेची लांबी १३१ किलोमीटर असून ५ वर्षात १० हजार १५४ कोटी रुपये खर्चात हा प्रकल्प पूर्ण होऊ शकतो, असं ते म्हणाले.

**होल्ड अश्विनी वैष्णव**

राष्ट्रीय महामार्ग १६० ए च्या घोटी-त्र्यंबक-पालघर या टप्प्याचं चौपदरीकरण करण्याचा निर्णयही केंद्र सरकारनं घेतला आहे. यामुळं दिल्ली-मुंबई द्रुतगती

महामार्ग, समृद्धी महामार्गाशी हा भाग जोडला जाणार आहे. १५४ किलोमीटर लांबीच्या या मार्गासाठी ३ हजार ३२० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.

१ लाख कोटी रुपयांचा अर्बन चॅलेंज फंड उभारण्याचा निर्णयही केंद्र सरकारनं घेतला आहे. १० लाखांहून अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांना याचा लाभ होईल. यातून शहरांचा पुनर्विकास, शहरांचं वृद्धी केंद्रात रुपांतर तसंच पाणी आणि स्वच्छता या समस्यांवर काम केलं जाईल. याशिवाय १० हजार कोटी रुपयांचा स्टार्टअप इंडिया फंड ऑफ फंडही केंद्र सरकार सुरू करणार आहे.

केंद्रीय मंत्रीमंडळाची साऊथ ब्लॉक मध्ये झालेली ही शेवटची बैठक होती. या पुढच्या बैठका सेवा तीर्थमध्ये होणार आहे. नॉर्थ ब्लॉक आणि साऊथ ब्लॉकच रुपांतर युगे युगीन भारत या संग्रहालयात होणार असल्याची माहिती वैष्णव यांनी दिली.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज आसाममधल्या दिब्रुगढमध्ये मोरान बायपास इथल्या आपत्कालीन परिस्थितीत विमानं उतरवण्याच्या धावपट्टींचं उद्घाटन केलं. आपल्या आजच्या आसाम भेटीसाठी ते आज सकाळी याच धावपट्टीवर उतरले. भारतीय हवाई दलाच्या सहकार्यानं दिब्रुगढमधल्या एका राष्ट्रीय महामार्गालगत या धावपट्ट्या उभारल्या आहेत. आपत्कालीन परिस्थितीत लष्करी आणि नागरी विमानं उतरवणं आणि त्यांचं उड्डाण करण्यासाठी या धावपट्ट्या विकसित केल्या आहेत.

या धावपट्ट्यांच्या उद्घाटनानंतर प्रधानमंत्र्यांनी लढाऊ विमानं, वाहतूक विमानं आणि हेलिकॉप्टर्सच्या हवाई प्रात्यक्षिकांचीही पाहणी केली. यावेळी भारतीय हवाई दलाच्या सुखोई थर्टी एम के आय, राफेल आणि तेजस या लढाऊ विमानांसह, वाहतूक विमानं आणि प्रगत हलक्या हेलिकॉप्टर्सनी प्रात्यक्षिकं सादर केली.

यानंतर प्रधानमंत्री याच धावपट्ट्यांवरून गुवाहाटीसाठी रवाना झाले. गुवाहाटी इथं ते ५ हजार ४५० कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाच्या विविध प्रकल्पांचं उद्घाटन आणि लोकार्पण करणार आहेत.

**<><><><><>**

आर्थिक प्रगती, उद्योग-रोजगार वाढ आणि सर्वसमावेशक विकास या तत्त्वांवर आधारित यंदाचा अर्थसंकल्प हा विकसित भारताच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल असल्याचं केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयुष गोयल यांनी शनिवारी स्पष्ट केलं. मुंबईत भाजप प्रदेश कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. २०२६ चा हा अर्थसंकल्प ‘अमृतकाळातील विकसित भारत २०४७ च्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल असणार आहे. या अर्थसंकल्पातून राज्याला मोठा लाभ मिळाला आहे. राज्यातल्या रेल्वे आणि पायाभूत क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक निश्चित करण्यात आली असून राज्यासाठी सुमारे २४ हजार कोटी रुपयांची रेल्वे तरतूद करण्यात आली आहे, असं त्यांनी सांगितलं. मुंबईतल्या IICT च्या माध्यमातून अनेक ठिकाणी छोटी केंद्र सुरू करणं, पुणे आणि नागपूरला ग्रोथ हब म्हणून विकसित करण्याची योजना आणि विविध परिवहन प्रकल्पांचा राज्याला फायदा होणार आहे, असं गोयल म्हणाले.

**<><><><><>**

भारत-अमेरिका व्यापार कराराबाबत काँग्रेस नेता राहुल गांधी यांनी केलेले आरोप खोटे असल्याचा पुनरुच्चार केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पियुष गोयल यांनी केला. या करारात शेतकऱ्यांच्या हिताचा पूर्ण विचार केलेला आहे आणि या करारामुळे शेतकरी, मासेमार, युवा, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग, स्टार्टअप्स, कारागीर आणि विश्वकर्मा यांना फायदा होईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. विविध देशांबरोबर झालेल्या मुक्त व्यापार करारांबद्दल ते म्हणाले…

***होल्ड... बाईट- पियुष गोयल***

**<><><><><>**

अमेरिकेने इराणमध्ये मोठी सैन्य कारवाई करण्याचे संकेत दिले आहेत. इराणमध्ये सत्ताबदल ही सर्वात चांगली गोष्ट होईल, असं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प म्हणाले. नॉर्थ कॅरोलिनात सैन्य तुकड्यांना भेट दिल्यानंतर ते माध्यमांशी बोलत होते. इराणविरोधात सैन्य कारवाईसाठी अमेरिका मध्यपूर्व आखातात दुसरी युद्ध नौका पाठवणार असल्याच्या वृत्ताला ट्रम्प यांनी दुजोरा दिला. करार झाला नाही तर याची आवश्यकता लागेल, असे ट्रम्प पत्रकारांना म्हणाले.

दरम्यान, अमेरिकेने अवास्तव मागण्या टाळल्या तर दोन्ही देशांमध्ये वाटाघाटी पुढे सरकतील आणि ते दोन्ही देशांच्या परस्पर हिताचं रक्षण करतील, असं इराणचे सर्वोच्च नेते अली खामेनी यांच्या वरिष्ठ सल्लागार अली शामखानी यांनी काल कतारच्या अल जजिरा वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत म्हटलं आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीचे अध्यक्ष तारिक रहमान यांचे त्यांच्या पक्षाच्या विजयाबद्दल अभिनंदन केले. दोन्ही शेजारी देशांचे ऐतिहासिक आणि सांस्कृतिक संबंध आहेत. दोहोंच्या शांतता, प्रगती आणि समृद्धीसाठी भारत वचनबद्ध राहील, असं प्रधानमंत्री मोदी यांनी समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी - बीएनपीला देशातील सर्वसाधारण निवडणुकांमध्ये दोन तृतीयांश बहुमत मिळालं. आतापर्यंत २९७ जागांचे निकाल जाहीर झाले. यापैकी २०९ जागांवर बीएनपीनं विजय मिळवला आहे.

बांगलादेशच्या संसदेत ३०० जागा असून बहुमतासाठी १५१ जागांची आवश्यकता आहे.

विजयानंतर बीएनपीचे अध्यक्ष तारिक रहमान यांनी काल त्यांच्या निवासस्थानाबाहेर येऊन मतदारांचे आभार मानले.

दरम्यान, बांगलादेश जमात-ए-इस्लामी पक्ष आणि त्यांच्या ११ पक्षीय आघाडीनं मतमोजणी आणि निकालांच्या घोषणेत अनियमितता असल्याचा आरोप केला. तक्रारींचं निवारण न झाल्यास आंदोलनाचा इशारा दिला.

निकालानंतर मुंशीगंज आणि पतुआखली भागात तुरळक हिंसक घटना घडल्या. यात एकाचा मृत्यू झाला.

<><><><><>

रशियाच्या, सीमेलगतच्या  बेल्गोरॉड या भागात युक्रेननं क्षेपणास्त्र हल्ला केल्याचं वृत्त आहे. या हल्ल्यात दोन जणांचा मृत्यू झाला, तर पाच जण जखमी झाले असल्याची माहिती तिथल्या अधिकाऱ्यांनी दिली आहे. या हल्ल्यामुळे या भागातल्या ऊर्जा आणि विद्युत प्रकल्पासह, तीन इमारतींचं मोठं नुकसान झालं असल्याचं या अधिकाऱ्यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २०१९ मध्ये पुलवामा दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या जवानांना आदरांजली वाहिली. सुरक्षा जवानांच्या बलिदानाचं देश कायम स्मरण करेल असं उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी समाजमाध्यमांवरील पोस्टमध्ये म्हटलं आहे. शहीद जवानांच्या दुर्दम्य साहसातून प्रत्येक भारतीयाला प्रेरणा मिळेल, अशा शब्दांत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावरील संदेशातून शहीद जवानांना आदरांजली वाहिली. शहीदांचं बलिदान सीमापार दहशतवाद खपवून न घेण्याचा देशाचा निर्धार आणखी बळकट करतं, असं परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

न्यायाधीश परिपूर्ण नसल्यामुळे नाही, तर आपल्यातले दोष नजरेआड करण्याच्या न्यायाधीशांच्या भूमिकेमुळे न्यायपालिकेतल्या नेतृत्वाला फटका बसतो, असं प्रतिपादन सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत यांनी काल केलं. कॉमनवेल्थ ज्युडिशिअल एज्युकेटर्सच्या ११व्या द्वैवार्षिक बैठकीच्या उद्घाटन सत्रात ते बोलत होते. या संस्थेच्या सदस्य देशांमध्ये न्यायप्रक्रियेचं शिक्षण, वकील आणि न्यायाधीश यांचं एकत्रीकरण करून कॉमनवेल्थ ॲपेक्स बॉडी स्थापन करावी, अशी आग्रही सूचना त्यांनी केली. न्यायपालिकेतल्या संस्थांप्रमाणेच न्यायाधीशांनीही दुरुस्ती, सुधारणा आणि बदल यासाठी तयार राहायला हवं, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

नवी दिल्लीत १६ ते २० फेब्रुवारी दरम्यान इंडिया एआय इम्पॅक्ट समिट २०२६ ही शिखर परिषद होणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातल्या जागतिक सहकार्याच्या दृष्टीनं ही ही शिखर परिषद ऐतिहासिक टप्पा ठरणार आहे. या शिखर परिषदेत संयुक्त अरब प्रतिनिधी मंडळ सहभागी होणार आहे. संयुक्त अरब अमिरातीचे अध्यक्ष मोहम्मद बिन झायेद अल नाह्यान यांच्या वतीनं, अबुधाबीचे युवराज खालिद बिन मोहम्मद बिन झायेद अल नह्यान हे या प्रतिनिधी मंडळाचं नेतृत्व करतील.

**<><><><><>**

टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत कोलंबो इथं आज ब गटात आयर्लंड आणि ओमान यांच्यातला सामना सुरु आहे. या सामन्यात आयर्लंडनं ओमानसमोर विजयासाठी २३६ धावांचं आव्हान ठेवलं आहे.

**//<><><><><>//**